विषय:- गांवठाणविस्तार योजना -
क्र. एच्.एस्‌जी-५

प्लॉटस्‌चे वाटप व ग्रामपंचायतीकडून जमिनी काढून घेणें ह्याबाबत.

महाराष्ट्र शासन.
महसूल व वन विभाग.
परिपत्रक क्रमांक एल्.एन्.डी. १०६६-१८५६१९-ख.
सचिवालय, मुंबई क्रमांक-३२, दिनांक २ जानेवारी १९६७.

## परिपत्रक

गांवठाणविस्तार योजना क्रमांक एच्.एस.जी.-पांच-ह्याखालीं होणारे प्लॉटस्‌चे वाटप लिलावाने करावे की काय असा प्रश्न शासनास विचारण्यांत एका जिल्हाधिकाऱ्यांनीं विचारला आहे. गांवठाण विस्तार योजनेचे मुख्य उद्दिष्ट गांवातील सर्व खऱ्या बेघर रहिवाशांना घरे बांधण्यासाठीं जागा उपलब्ध करून देणे हे आहे. शासन निर्णय, महसूल विभाग, क्र. एल्.एन्.डी.३९६०-२०६९८-अे, दिनांक ९ जून १९६१ मधील आदेशाप्रमाणे गांवातील हल्लीची गरज व पुढील दहा वर्षांत होणारी वाढ लक्षांत घेऊन मामलेदार ह्यांनी एकंदर किती जागा लागेल ह्याचा आढावा घ्यायचा आहे. ह्याचप्रमाणे शासन निर्णय, महसूल विभाग, क्रमांक.एल्.एन्.डी.३९५९-५६०४७-व्ही, दिनांक १५ नोव्हेंबर १९६३ मध्ये प्लॉटस् प्रत्येकी किती क्षेत्रफळाचे असावेत ह्याचे प्रमाण ठरवून दिले आहे व प्लॉटस्‌ची किंमत कोणाकडून व किती वसूल करावी यासंबंधी सूचना शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एल्.एन्.डी.१०६५-१३६४-व्ही, दिनांक ५ एप्रिल १९६५ मध्ये खुलासेवार दिल्या आहेत. यावरून हे कळून येईल कीं, गांवठाण विस्तार योजनेखाली जमिनीचे वाटप करतांना जमिनीचे प्लॉटस् लिलावांने देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

२. खाजगी जमिनी भूसंपादन कायद्याखालीं संपादन करून गांवठाण विस्तारासाठी उपलब्ध करून देण्यास फार वेळ लागतो. तेव्हां मुंबई ग्रामपंचायत कायद्याच्या कलम ५९(१) खाली सरकारी जमिनी ज्या कारणांसाठी ग्रामपंचायतीचे ताब्यांत दिल्या आहेत, त्यापैकी ग्रामपंचायतीस नको असेल अशी जमीन मुंबई ग्रामपंचायती कायद्याच्या कलम ५१(१अ) खाली ग्रामपंचायतीकडून काढून घेऊन व तिचा वापर गांवठाणविस्तार योजनेसाठीं करतां येईल काय याचा जिल्हाधिकाऱ्यांनीं विचार करावा. ग्रामीण विकास

मागे पहा.

विभागानें, क्र.व्ही.पी.एस्.५१६६(५१)-२०५३३-ई, तारीख २७ ऑगस्ट १९६६ च्या अधिसूचनेव्दारे अशा जमिनी काढून घेण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना दिले आहेत. त्या अधिकारांचा ग्रामपंचायतीच्या संमतीने योग्य वापर केल्यास गांवठाणविस्तार योजनेसाठी जमीन उपलब्ध होण्यास विलंब लागणार नाहीं.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

व. शं. कुलकर्णी,
अवर सचिव, महसूल व वन विभाग.

प्रति:-

सर्व आयुक्त,
जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमि अभिलेख, पुणे,
संचालक, नगर रचना, पुणे,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व भूसंपादन अधिकारी व विशेष भूसंपादन अधिकारी,
ग्रामीण विकास विभाग (शाखा क्रमांक ३),
महसूल व वन विभागातील अ. अ१ ... [illegible]